
8

# महात्मा फुले
## चिंतन आणि चर्चा

• संपादक •
डॉ.भगवान डोंगरे
डॉ.गोवर्धन मुळक



Scanned with OKEN Scanner

७९. फुले, शाहू, आंबेडकरांची अनुसूचित प्रवर्गातील लोकांच्या राजकीय सामाजिककरणामधील भूमिका २७५
भीमराव लक्ष्मण शिरसाट

८०. महात्मा फुले : विचार, समाजसुधारणा व प्रासंगिकता २७८
मंजुषा स्वामी पारिपेल्ली-पर

८१. महात्मा फुले यांच्या कार्याचा : एक अभ्यास २८१
डॉ. महादेवी वैजनाथ फड , कावळे एस.टी..

८२. महात्मा जोतीबा फुलेचे शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक विचार २८५
प्रा. हंगरगेकर विठ्ठल निवृत्तीराव

८३. समाजक्रांतिकारक जोतीराव फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता २८८
प्रा.डॉ.जयराम श्री. सूर्यवंशी

८४. महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता २९१
प्रा.कुकडे एस.जे. - प्रा. जुमडे जी.के.

८५. महात्मा जोतीबा फुले यांचा सामाजिक विचार एक अभ्यास २९७
प्रा.डॉ. उन्मेष मारोती शेकडे

८६. जोतीराव फुले के सामाजिक विचार और प्रासंगिकता ३०५
अंकुश कडुबा राऊत

८७. आद्य समाजसुधारक महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य ३०९
प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी

८८. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा ३१३
प्रा. हिवराळे के.बी.

८९. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा ३१६
प्रा.डॉ. काळे सुनिल राचन्ना

९०. महात्मा फुले : स्त्री प्रश्न आणि सुधारणा ३१९
प्रा.डॉ.सुषमा शंकरराव प्रधान - घेवंदे

९१. महात्मा फुले यांचे कृतीयुक्त शैक्षणिक विचार ३२४
प्रा.डॉ. विवेकराजे (विठ्ठल) घोलप

९२. स्त्री जीवनातील परिवर्तनात महात्मा फुलेंच्या विचारांचे योगदान ३२७
सहा. प्रा. पुरूषोत्तम बांडे

९३ महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य ३३०
योगेश रामकृष्ण वायाळ - रामेश्वर लिंबाजी दिवटे


Scanned with OKEN Scanner

८७

# आद्य समाजसुधारक महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य

**प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी**
मराठी विभाग
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :**

बहुजन समाजास अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढून ज्ञानरूपी प्रकाशाच्या वाटेवरती घेऊन जाणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले. १९ व्या शतकातील एक महान विभूती, समाज सुधारक, तत्व चिंतक आणि लोकोत्तर युगपुरूष होत. महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्यात त्यांच्या धर्मपत्नी सावित्रीबाई फुले यांनी खंबीर साथ दिली. त्यामुळे ते भारतीय विशेषतः महाराष्ट्रातील प्रबोधनाचे आद्य व खंदे प्रवर्तक म्हणून ओळखले जातात.[१] महात्मा जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना तत्कालीन भारतीय समाजात प्रचलित असणारी शिक्षण व्यवस्था व तिचे स्वरूप विचारात घेणे आवश्यक आहे. शिक्षणतूनच खरे परिवर्तन होते, आधी शिक्षण दिले पाहिजे याच विचार धारेतून १८ व्या शतकात दीनदलित, बहुजन स्त्रियांना योग्य शिक्षण समानतेचा हक्क सर्वांना मिळाला पाहिजे. यासाठी धडपड करणाऱ्या अनेक समाजसुधारकांचा उदय झाला, यामध्ये सर्वात अगोदर क्रम लागतो तो महात्मा जोतराव गोविंदराव फुले यांचा. तद्नंतर याच परंपरेत राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे, पंजाबराव देशमुख यांच्या कार्यांची प्रेरणा घेऊन मराठवाड्यात शिक्षण प्रसार व प्रचाराचे कार्य शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरूजींनी केले आहे. बहुजन समाज शिक्षणाच्या परिप्रेक्षात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. १८ व्या शतकात भारतात सर्वत्र इंग्रजांचे साम्राज्य पसरलेले होते. भारतीय समाजाचा इंग्रजी समाज संस्कृतीचा संबंध आलेला होता. अनेक जुन्या चालीरीती प्रथा-परंपरा अनिष्ट कर्मकांड, देव-दैव, धर्म-पुजा, कर्म-संकेत, स्वर्ग-नरक व पाप-पुण्य अशा बाबींचा सामान्य नागरिकांसमोर प्रचंड मोठ्या प्रमाणात अनेक अडचणी निर्माण होत होत्या या सर्व सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करून महात्मा ज्योतिबा फुले यांनी माणसाला माणूस म्हणून जीवन जगता यावे यासाठी तसेच त्यांच्या पिढ्यानपिढ्या प्रस्थापितांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व्यवस्थेला हादरून सोडण्याचे काम त्यांनी केले. दलित व शोषितांसाठी क्रांतीमुक्तीची प्रबळ प्रेरणा देण्याचे, इतिहास सत्याचा नव्याने शोध घेणाऱ्या या महात्मा फुलेंच्या कार्याविषयी एक कवी राजकुमार गाजरे यांनी आपल्या क्रांतीसूर्य ज्योतिबा कवितेतून रेखाटले ते सार्थ ठरते.

**इतिहासाची जाण जोतिबा । क्रांतीची मशाल जोतिबा ।**
**क्रांतीची भाषा जोतिबा । शिक्षणाचा प्रसार जोतिबा ।।२**

याप्रमाणे बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य उत्तम रीतीने केले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१. महात्मा फुले यांच्या पहिल्या कार्याचा आढावा घेणे.
२. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या तत्कालीन असलेल्या सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.
३. ब्रिटिश सरकारच्या तत्कालीन शैक्षणिक धोरण व प्रतिकूल परिस्थितीचा अभ्यास करणे.



Scanned with OKEN Scanner

४. भारतीय सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी वैचारिक क्रांतीचा दिलेला लढा विचारात घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उपलब्ध असलेल्या प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीयक स्त्रोतांचा वापर करून तथ्य संकलन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे प्राप्त माहितीचे वर्णन व विश्लेषणात्मक आणि वस्तुनिष्ठ संशोधन पद्धतीचा या ठिकाणी अवलंब करण्यात आला आहे.

महात्मा फुले यांच्या अलौकिक व व्यापक शैक्षणिक कार्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना महाराष्ट्राचा मार्टिन ल्युथर असे म्हटले, तसेच दुसरे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना हिंदुस्थानचा वॉशिंग्टन असे म्हटले आहे. उपेक्षित दीन दलित तरूणांना त्यांच्या सामाजिक जीवनात माणूस म्हणून त्यांना वागणूक देण्यात यावी. यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविरत परिश्रम घेतले. ज्योतिबांचे पूर्वज सातारा येथील कटगुण येथे राहत असत, त्यावेळी त्यांचे आडनाव गोऱ्हे असे लावले जाई. पुढे ते पुण्यात स्थायिक झाले. तेथे ज्योतिबांचे वडील गोविंदराव भाजीपाला फुलांचा व्यवसाय करू लागले. त्यांचा हा व्यवसाय त्या काळामध्ये नावारूपाला आला, त्यामुळे त्यांचे फुले हेच आडनाव कायमस्वरूपी झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या व्यवसायात स्थिर झाल्याने ते पुणे येथे स्थायिक झाले. गोविंदरावांनी धनकवडीच्या झगडे पुण्यातील चिमणाबाई सोबत विवाह केला. त्यांना दोन मुले झाली. त्यातील थोरला राजाराम व धाकटा ज्योतिबा म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक आणि दलितोद्धाराचे काम करणारे ज्योतिबा फुले यांचा जन्म २० फेब्रुवारी १८२७ रोजी पुणे येथे झाला. वयाच्या सातव्या वर्षी ज्योतिबा शाळेत जाऊ लागले. परंतु शूद्राने शाळेत शिक्षण घेणे महापाप असे तत्कालीन सामाजिक परिस्थितीत मानले जात असे. याचवेळी त्यांच्या वडिलांना एका मुसलमान व इंग्रज गृहस्थाने शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. हे ऐकून महात्मा फुले यांना त्यांच्या वडिलांनी शिक्षण घेण्यासाठी इंग्रजांच्या ख्रिस्ती मिशनरी शाळेत टाकले. याच काळात पाश्चिमात्य विचारवंत थॉमस पेन यांचे राईट ऑफ मेन हे पुस्तक वाचनात आले त्या वेळी त्यांना कळले की तत्कालीन समाजातील व धर्मातील प्रचंड दारिद्र्य विषमता ही ईश्वर निर्मित नसून मानवनिर्मित आहे. या काळात त्यांच्या पुढे एक त्यांना प्रसंग अनुभवता आला. ते परांजपे नावाच्या एका मित्राच्या लग्नात गेले होते. मात्र गरीब शूद्र असल्याने लग्नात वरातीमागून जाताना त्यांना हाकलून देण्यात आले. तेंव्हापासून या प्रसंगावर त्यांनी खूप चिंतन केले, त्यातूनच समाजात असणारी प्रचंड विषमता याविरूद्ध लढा देण्यास सुरूवात केली. महात्मा फुले यांनी प्रचलित हिंदू समाजातील मतलबी रूढीचा प्रथा परंपरांचा अंधश्रद्धेचा शालेय अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर लहुजी वस्ताद कडून शारीरिक व्यायामाचे धडे गिरवले. साधी राहणी, उच्च विचारसरणी अशी त्यांची विचारधारा होती. समाजात असणारी गरीबी श्रीमंतीची दरी दिवसेंदिवस वाढत जाते हे केवळ विशिष्ट वर्गातील सत्ता प्रभावामुळे सामान्य लोकांच्या जीवनात प्रचंड मोठी गुलामगिरी येताना दिसते. अशा परिस्थितीमध्ये त्यांनी आपले भावी आयुष्य त्यातील दिशा ठरवून दिले. कोणत्याही सरकारी नोकरीशिवाय सामाजिक कार्य करायचे असा त्यांनी निर्धार केला. भारतीय समाजातील दारिद्र्य दूर करण्यासाठी एकमेव पर्याय आहे. तो म्हणजे शिक्षणाच्या प्रवाहात सर्व सामान्य व्यक्तीला आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पुढे १८४७ पर्यंत महात्मा फुले यांनी शिक्षण घेतले त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आणि प्रगल्भ झाले. त्यानंतर १८४८ मध्ये पुणे येथे मुलींची पहिली स्वतंत्र शाळा काढली. तत्कालीन पडलेल्या समाजाला त्यांचे कार्य रूचले नाही. अनेक लोकांनी विरोध केला तरी परंतु त्याची पूर्व तयारी म्हणून महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला सर्वप्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी आपल्या पतीच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात मनापासून कार्य केले. याचा परिणाम म्हणून १८५१ मध्ये दुसरी शाळा अनुक्रमे मुलींसाठी काढली आणि खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या परंपरेला शाळेच्या माध्यमातून सुरूवात झाली. तत्कालीन त्यांच्या कार्यामुळे त्यांच्या सर्वच शाळा अत्यंत व्यवस्थितपणे चालवल्यामुळे त्याची दखल घेऊन तत्कालीन इंग्रज अधिकारी सर मेजर कँडी यांनी (दक्षिणा प्राईज कमिटी)



Scanned with OKEN Scanner

सरकारतर्फे ७५ रूपये अनुदान त्यांना दिले. परंपरा प्रिय असलेल्या भारतीय समाजाला प्रगती कडे घेऊन जायचे असेल तर भ्रामक रूढी, प्रथा, परंपरा, अनिष्ट चालीरीती, अंधश्रद्धा, अस्पृश्यता व कर्मकांड, इ. गोष्टींचे उच्छाटन करणे आवश्यक आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. तसेच आपल्याला ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान यांची कास धरावी लागेल. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, अस्पृश्य वर्गाच्या कार्यामुळे त्यांचा गौरव करण्यात आला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, बुद्धीप्रामाण्यवाद्यासाठी तं पडू लागले. सतीची प्रथा, बालजरठविवाह, केशवपन, अंधश्रद्धा निर्मूलन अशा समाज विधायक कार्यात त्यांनी प्रचंड मोठे योगदान दिले. ते खऱ्या अर्थाने बोलके सुधारक नसून कर्ते सुधारक होते. केवळ शाब्दिक विरोध न करता आलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी म्हणून अनेक ठिकाणी बालहत्या प्रतिबंधक गृह ही संस्था सुद्धा सुरू केली. त्याचबरोबर दैन्य दारिद्र्य यामध्ये खितपत पडलेले जे बहुजन होते त्यांच्यासाठी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला केला. भारतीय समाजाचा अन्नदाता पोशिंदा असणारा शेतकरी वर्ग हा खऱ्या अर्थाने मागासलेला आहे. वर्षानुवर्ष अज्ञान अंधश्रद्धा चालीरीती रूढी-परंपरा व गुलामगिरीत अडकलेला आहे. असंघटित असल्याने त्यांचे अतोनात हात होतात हे ओळखून त्यांना एकत्रित आणण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी केली. महात्मा फुले यांनी सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. यावरून त्यांनी विविध प्रकारचे ग्रंथ लेखन केले. त्यात शेतकऱ्यांचा असूड (१८८३), ब्राह्मणांचे कसब (१८६९), गुलामगिरी (१८७३), शिवाजी महाराजांचा पोवाडा (१८६९), सार्वजनिक सत्यधर्म (१८८५) या ग्रंथांच्या माध्यमातून अशा प्रकारे जागृती चळवळ त्यांनी उभी केली. मूलगामी तर्कशुद्ध अशा प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या गुलामगिरी या ग्रंथातील हे खालील ओळी वरून लक्षात येईल,

**विद्येविना मती गेली । मती विना नीती गेली ।**
**निती विना गती गेली । गती विना वित्त गेले ।**
**वित्ता विना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।३**

थोडक्यात शिक्षण हे समाज परिवर्तनाचे दुरगामी असणारे प्रभावी माध्यम आहे. दलित अस्पृश्य स्त्रिया व बहुजन समाज यांच्यासाठी अनाथाश्रम वृत्तपत्रे आणि शेतकरी पोहोचवल्या आपल्या सर्वांचा असलेला समाजाचा कणा असलेला घटक म्हणजे शेतकरी होय. याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे विशेषतः शेतकऱ्यांच्या कुटूंबातील सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. असा अट्टाहास त्यांनी केला होता. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इतिहास, संस्कृती यावर भर देऊन सामाजिक विचारांची क्रांती केली. वयाच्या ६० व्या वर्षी त्यांना मुंबई येथील सामान्य जनतेच्या वतीने रावबहादुर वडेकर यांनी महात्मा ही पदवी बहाल केली.[४]

शिक्षणाच्या माध्यमातून जे ज्ञान मनुष्याला होते, त्यावरून विचारांची प्रगल्भता अवलंबून असते. त्यांच्या मते शिक्षणा अभावी व्यक्ती हा पशु समान असतो.ज्ञानाशिवाय केलेली सर्व कामे निरर्थक असतात. असा माणूस हा एकप्रकारे पाषाणच असतो उचभ्रू समाजाने शिक्षण व ज्ञानाचे दरवाजे शूद्र अतिशूद्रांसाठी बंद केलेली असल्याने त्यांना त्यांच्या अवस्था अत्यंत विकट झालेल्या होत्या. जोतिबांनी दूरगामी शिक्षणाची व्यवस्था ब्रिटीशांकडून अपेक्षा व्यक्त केली होती. त्यांनी तत्कालीन असलेल्या शिक्षणविषयक झिरपता सिध्दांताला विरोध केला होता आणि स्वतंत्र अशा सार्वत्रिक शिक्षणाची संकल्पना मांडली होती, पुढे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अलीकडच्या काळातील शासनाने प्रयत्न केले आहेत. सर्वसमावेशक आणि सर्व थरातील समाजातील लोकांसाठी विशद केली होती. यामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण म्हणजे जात, धर्म, पंथ, लिंग आणि शारीरिक अपंगता याचा अडसर न ठेवता समाजातील सर्व घटकांना समतेच्या तत्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे होय.[५]

शिक्षणाविषयी महात्मा फुले यांनी जे विचार मांडले, ते खऱ्या अर्थाने स्वानुभवावर अवलंबून आहेत. शिक्षणातून उपेक्षित बहूजन वर्गाचे कल्याण व्हावे, असे त्यांना नेहमी वाटतं असे. ते पुढे म्हणतात, शिकून सुशिक्षितांची संख्या शेकडो



Scanned with OKEN Scanner

पटीने वाढत जाईल. पण केवळ नोकरीच्या पाठीमागे लागण्याची गरज न पडता त्या सर्वांना उपयुक्त व्यवसाय आणि रोजगार उद्योगधंदे पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील, असा काळ फारसा दूर नाही.[६]

एकूणच महात्मा फुले हे त्रेसष्ट वर्ष चंदनासारखे भारतीय समाजाच्या उत्थानासाठी प्रवास करीत राहिले. अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि लोकशाही जीवनमूल्यांवर सातत्याने भर दिला. स्त्री आणि पुरुष यांच्यातील मतभेद सुध्दा त्यांना मान्य नव्हता. ते नेहमी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना अधिकार असावेत असे मानीत, जन्मतः स्त्री आणि पुरुष हे स्वतंत्र आहेत. त्यांना निवडीसाठी समान संधी आहे. मत मांडण्याचा स्त्रियांनाही सारखेच हक्क आहेत. शिक्षक हा समाजाला दिशा देणारा महत्त्वाचा घटक असून शिक्षकाची जबाबदारी केवळ शाळेपुरती मर्यादित नाही, त्याचा समाजाशी घनिष्ठ संबंध निर्माण होणे तितकेच आवश्यक असते. तसेच शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक समाजशास्त्र ही संकल्पना महत्त्वाची असून शिक्षण व समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास असणे आवश्यक आहे, असे महात्मा फुले यांचे दूरगामी मत होते.

**समारोप :**

प्रचलित समाजव्यवस्था ही ब्राम्हणांनी आपले वर्चस्व गाजवले आहे, ते म्हणत आपण सर्वजण एकाच निर्मिकाची लेकुरे आहोत. मग आपल्याच निर्मिकाची (देवाची) भेट (दर्शन) घेताना कोणत्याही प्रकारच्या मदयस्थांची गरज नसते. ज्याप्रमाणे आई-वडिलांना भेटायला कोणत्याही प्रकारच्या मदयस्थांची गरज नसते. त्यांच्या या असीम कार्याबद्दल भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आपले गुरु मानले. थोडक्यात संत वचनाप्रमाणे बोले तैसा चाले त्याची वंदाची पाऊल याप्रमाणेच महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविरतपणे शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक विधायक परिवर्तनासाठी आपले आयुष्य वेचले असा हा महात्मा ज्योतिबा फुले यांनी २८ नोव्हेंबर १८९० रोजी जगाचा निरोप घेतला.

**संदर्भ :**


१. डॉ. दादाराव गुंडरे, मराठी कवितेतील महानायकांचे दर्शन, मैत्री प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट २०१८.

२. प्रा. राजकुमार गाजरे, बहुजनांच वादळ, पार्थ कॉम्प्युटर, औरंगाबाद.

३. कीर धनंजय, डॉ. मालशे स. ग. व डॉ. फडके य. दि. (संपा.),महात्मा फुले समग्र वाङ्मय शेतकऱ्यांचा आसूड, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई, सहावी आवृत्ती.

४. श्री पं. स. पाटील, महात्मा ज्योतिराव फुले,महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९३८.

५. प्रा. सरदार गं. बा. महात्मा फुले,व्यक्ती आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८२.

६. कित्ता, हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन.

७. कुलकर्णी अ. रा.,महात्मा ज्योतिराव फुले, सामाजिक व सांस्कृतिक कार्य, डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथमावृत्ती २००८.

८. प्रा. डॉ. सतीश ठोंबरे,महाराष्ट्रातील समाजसुधारक,कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

९. www.google.com




Scanned with OKEN Scanner